# 'ए-व्ह्यू' तंत्रज्ञानाला फिक्की तर्फे राष्ट्रीय पुरस्कार

मुंबई: अमृता युनिव्हर्सिटीच्या खुला स्रोत असणाऱ्या ए-व्ह्यू' या ई-लर्निंग तंत्रज्ञानातल्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल एफआयसीसीआयचा (ऋइउउऋ) राष्ट्रीय पुरस्कार पटकावला आहे. निती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद पानगारिया यांच्या हस्ते अमृता युनिव्हर्सिटीच्या ई-लर्निंग रिसर्च लॅबचे डायरेक्टर प्रा. कमल बिजलानी यांनी १२ व्या एफआयसीसीआय हायर एज्युकेशन समिटमध्ये हा पुरस्कार स्वीकारला. या कार्यक्रमाचे उद्घाटन मनुष्यबळविकास मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांच्यासह आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि युरोपिअन कमिशनच्या सांस्कृतिक आणि शिक्षण विभागाच्या डायरेक्टर जनरल मार्टिन रिर्चेट्स यांनी केले.

अमृता युनिव्हर्सिटीच्या ई-लर्निंग रिसर्च लॅबचे डायरेक्टर प्रा. कमल बिजलानी म्हणाले, ए-व्ह्यूच्या माध्यमातून उच्चशिक्षणातल्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल एफआयसीसीआय (ऋइउउऋ) पुरस्कार मिळाल्याने आम्हाला अमृता युनिव्हर्सिटीमध्ये अत्यंत आनंद झाला आहे. भारतातल्या दर्जेदार शिक्षकांच्या टंचाईवरचा प्रभावी तोडगा म्हणून 'ए-व्ह्यू' फायदेशीर ठरत असल्याचं हे उत्तम उदाहरण आहे. हे एक दृक-श्राव्य व्यासपीठ असून ते ११,००० शैक्षणिक संस्थांकडून उच्च शिक्षणासाठी वापरलं जात आहे. हा एक खुला स्रोत असून देशातल्या उच्चशिक्षणाला प्रोत्साहन मिळावं यासाठी मोफत पुरवलं जातं. 'ए-व्ह्यू' मुळे जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातला शिक्षक एकाचवेळी लाखो विद्यार्थ्यांबरोबर ऑनलाइन वर्ग, मीटिंग्ज, प्रशिक्षण सत्रं, कार्यशाळा आणि परिषदांच्या माध्यमातून संवाद साधू शकतो. विद्यार्थीही लाइव्ह ऑनलाइन सत्रांना उपस्थित राहून तज्ज्ञ शिक्षकांकडून आपल्या शंकांचं ऑनलाइन निरसन करू शकतात.'

'ए-व्ह्यू' हा ऑनलाइन आभासी वर्ग शेअर्ड व्हाइटबोर्ड, प्रश्न, प्रश्नमंजुषा, पोलिंग आणि मॉनिटरिंगच्या माध्यमातून विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये लाइव्ह दृक-श्राव्य संवाद घडवू शकतो. यामध्ये प्रशिक्षक या माध्यमाद्वारे कॉन्टेन्ट, कागदपत्रं, थ्रीडी वस्तू, डेस्कटॉप शेअरिंग आणि यूट्यूब व्हीडिओज शेअर करू शकतो. भारतात उच्चशिक्षणाला गती मिळण्यासाठी हे खुलं तंत्रज्ञान कॉलेजेस-विद्यापीठांना मोफत पुरवलं जातं. उडान' या कार्यक्रमांतर्गत अनेक सीबीएसई अधिस्वीकृती असणाऱ्या शाळांनीही हे तंत्रज्ञान स्वीकारलं आहे.

एफआयसीसीआय हेल्थकेअर एक्सलन्स अॅवॉर्डस २०१६ च्या माध्यमातून देशातल्या उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात भविष्यवेधी दृष्टिकोन, प्रक्रियांमधली अभिनवता आणि डिसरप्टिव्ह तंत्रज्ञानामार्फत विद्यापीठं आणि इतर उच्चशिक्षण देणाऱ्या संस्था तसंच व्यक्तींचं योगदान ओळखून त्यांनी बजावलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान केला जातो.

अमृता युनिव्हर्सिटीने भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या मदतीने ए-व्ह्यू' विकसित केलं आहे. अमृता युनिव्हर्सिटीच्या ई-लर्निंग रिसर्च लॅबचे डायरेक्टर प्रा. कमल बिजलानी म्हणाले,भारतात ए-व्ह्यूसारख्या सर्वंकष ई-लर्निंग माध्यमांची आत्यंतिक गरज आहे.

आपल्या देशातली निष्णात आणि तज्ज्ञ शिक्षक-प्रशिक्षकांची संख्या अत्यंत मर्यादित आहे, पण विद्यार्थ्यांची संख्या मात्र लाखाने आहे. या दोघांना थोड्याफार प्रमाणात जोडण्याचं काम ए-व्ह्यू करतं. ए-व्ह्यूमुळे शिक्षकांना शिकवता येतं आणि हजारो विद्यार्थ्यांशी ऑनलाइन संवाद साधता येतो, मग ते देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात असले तरीही. हे सर्व लाइव्ह ऑडिओ-व्हिज्युअल स्ट्रीमिंग आणि रचनाबद्ध कॉन्टेन्ट शेअरिंगच्या माध्यमातून रिअल-टाइम तत्त्वावर केलं जातं.'




ए-व्ह्यू सॉफ्टवेअर हे गटांसाठी वर्गामध्ये किंवा वैयक्तिक विद्यार्थ्यांसाठी कम्प्युटर किंवा स्मार्टफोनवर सेट-अप करता येतं. शिक्षकसुद्धा हेच सॉफ्टवेअर आपल्याकडे इन्स्टॉल करतात. सर्व्हर्सचा एक सेट वापरत हा प्लॅटफॉर्म काम करतो. अमृता युनिव्हर्सिटी आपल्या .रींळश्.ळप या वेबसाइटद्वारे ए-व्ह्यू सॉफ्टवेअर मोफत पुरवलं जातं तर यूजरला हार्डवेअरची तजवीज करावी लागते.